ePaper

# सुखोई विमान अपघातात महाराष्ट्राच्या वैमानिकाचा मृत्यू



वर्ष - 9 वे | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™




अर्थसंकल्पात पुण्याच्या विकासाला गती

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 07 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## ७५ हजार रिक्त पदांची भरती होणार; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची घोषणा

# लाडकी बहीण ते शेतकरी कर्जमाफी!

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्र राज्याचा २०२६-२७ सालचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. हा अर्थसंकल्प राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडला. अर्थसंकल्प सादर करताना फडणवीस यांनी माजी उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांचा आवर्जून उल्लेख केला. यंदाचा अर्थसंकल्प अजितदादाच मांडणार होते; मात्र दुर्दैवाने तो मला मांडावा लागत आहे, असेही ते म्हणाले. तसेच राज्यात अजित पवार यांचे स्मारक उभारण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली.**





यावेळी राज्यातील विविध विभागांतील भरतीबाबतही महत्त्वाची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. पुढील काळात राज्यात टप्प्याटप्प्याने विविध विभागांमध्ये भरती करण्यात येणार आहे. भविष्यात राज्यात ७५ हजार रिक्त पदांसाठी भरती केली जाणार असून ही भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत तसेच इतर यंत्रणांच्या माध्यमातून केली जाणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच महायुती सरकार स्थापन झाल्यापासून आतापर्यंत १ लाख २० हजार कर्मचाऱ्यांची पदभरती करण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला.

तसेच सारथी, बार्टी, आर्टी, टीआरटीआय, महाज्योती, वनार्टी, अमृत आणि मार्टी या संस्थांसाठी भरीव तरतूद करण्यात आल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

याशिवाय आदिवासी समाजातील युवकांना नावीन्यपूर्ण कल्पनांवर आधारित उद्योजक आणि उद्योगनिर्मिते घडवण्यासाठी 'भारत नवकल्पना, संशोधन आणि आत्मनिर्भरतेसाठी उद्योग निर्मिती – बिरसा' ही योजना राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. तसेच नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे.

यासोबतच बँकिंग व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना कायमस्वरूपी कर्जमुक्त करण्यासाठी समितीच्या शिफारशींनुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच 'स्व. गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान' या योजनेत शेतमजुरांचाही समावेश करण्यात आला आहे. दरम्यान, बारामती आणि पुरंदर तालुक्यातील अवर्षणप्रवण भागाला पिण्याचे पाणी व सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निरा-कऱ्हा नदीजोड प्रकल्प राबविण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

## अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या घोषणा

**सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना चालना**

महात्मा फुले यांच्या जन्माला २०० वर्षे पूर्ण होत असल्याने विविध कार्यक्रमांसाठी समिती स्थापन करून निधी दिला जाणार आहे. संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट विकसित केले जाणार आहे. तसेच बाबासाहेब आंबेडकर यांच्या शताब्दी वर्षानिमित्त रायगड येथे पायाभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचे काम पूर्ण झाल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

**अजित पवार यांचे स्मारक**

दिवंगत अजित पवार यांनी ११ वेळा राज्याचा अर्थसंकल्प सादर केला होता. त्यांच्या स्मरणार्थ भव्य स्मारक उभारले जाईल आणि त्यांच्या नावाने नागरी सेवा पुरस्कार सुरू केला जाईल, अशी घोषणा फडणवीस यांनी केली.

**ग्रामीण रस्ते आणि वाहतूक प्रकल्प**

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचा तिसरा टप्पा मंजूर करण्यात आला आहे. आतापर्यंत ३० हजार गावे जोडली गेली असून २,४५० किमी रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत. तसेच २३ हजार पूलांच्या कामांना गती देण्यात आली आहे. मुंबई–पुणे जलदगती ट्रेनसाठीही तरतूद करण्यात आली आहे.

**शेती आणि शेतकरी कल्याण**

गोपीनाथ मुंडे अपघात योजनेत शेतमजुरांचा समावेश केला जाणार आहे. ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत १ कोटी ३१ लाख शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार झाले आहेत. पुढील दोन वर्षांत महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियान सुरू करण्यात येणार आहे.

**उद्योग आणि गुंतवणूक**

राज्याचे नवीन गुंतवणूक धोरण जाहीर करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्यात सूक्ष्म व लघुउद्योग केंद्र उभारले जाणार असून ५० लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. गडचिरोली हे नवे स्टील हब म्हणून विकसित केले जात आहे.

**तंत्रज्ञान आणि गेमिंग उद्योग**

मुंबईत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी सुरू करण्यात येणार आहे. पुणे हे जीसीसीसाठी देशातील सर्वाधिक पसंतीचे शहर असल्याचे सांगत राज्यात २९५ पेक्षा अधिक गेमिंग स्टुडिओ उभारण्याची योजना जाहीर करण्यात आली.

**पर्यटन प्रकल्प**

सातारा जिल्ह्यातील वासोटा किल्ला येथे पर्यटकांसाठी रोपवे प्रकल्प उभारला जाणार आहे. तसेच नागपूरच्या रामटेक येथे तिसरी चित्रसृष्टी उभारण्याची घोषणा करण्यात आली.

**मेट्रो आणि द्रुतगती मार्ग**

मुंबईत आणखी एक भुयारी मेट्रो प्रकल्प उभारण्यात येणार आहे. अटल सेतू मुंबई विमानतळाला जोडला जाणार आहे. राज्यात १,२०० किमी मेट्रो मार्ग आणि ६,००० किमी द्रुतगती मार्ग विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**शेतकरी कर्जमाफी**

३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकित पीककर्ज असलेल्या शेतकऱ्यांसाठी "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना" जाहीर करण्यात आली आहे. या अंतर्गत २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान दिले जाईल.

**लाडकी बहीण योजना कायम**

महिलांसाठी सुरू असलेली "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना" पुढेही सुरू ठेवण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

# अर्थसंकल्पात पुण्याच्या विकासाला गती

## मेट्रो-रस्ते प्रकल्पांना निधी; पुरंदर विमानतळ आणि तंत्रज्ञान गुंतवणुकीवर भर

**महाईन्यूज । पुणे**

**महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात यंदा पुणे शहराच्या पायाभूत सुविधांना मोठे महत्त्व देण्यात आले आहे. शहरातील वाढती वाहतूक कोंडी, वाढणारी लोकसंख्या आणि औद्योगिक विस्तार लक्षात घेता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यासाठी अनेक महत्त्वाचे प्रकल्प जाहीर केले. विशेषतः मेट्रो, रस्ते, रेल्वे, विमानतळ आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे पुण्याच्या विकासाला नवे बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**




शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत करण्यासाठी PUNE METRO प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खडकवासला ते स्वारगेट आणि हडपसर ते खराडी या मार्गांचा विस्तार करण्यात येणार असून, त्यासोबतच हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर बस डेपो ते सासवड रोड या नवीन मेट्रो मार्गांनाही मंजुरी देण्यात आली आहे.

याशिवाय रामवाडी ते वाघोली या सुमारे ११ किलोमीटरच्या नवीन मेट्रो मार्गालाही हिरवा कंदील देण्यात आला आहे. नगर रोड परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे.

पुढील टप्प्यात शहरातील प्रमुख भागांना जोडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भुयारी मार्गांचा विचार केला जात आहे. येरवडा ते कात्रज आणि हिंजवडी ते सिंहगड रोड या सुमारे ५४ किलोमीटरच्या दुहेरी भुयारी मेट्रो मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतचा प्रवास अधिक वेगवान होणार आहे.

पुणे आणि लोणावळा दरम्यान वाढत्या प्रवास लक्षात घेऊन रेल्वे मार्गाचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मार्गावर तिसरी आणि चौथी रेल्वे लाईन टाकण्यासाठी सुमारे ५१०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याचा फायदा पिंपरी-चिंचवड, आकुर्डी आणि तळेगाव परिसरातील प्रवाशांना होणार आहे.

रस्ते विकासाच्या दृष्टीनेही काही मोठे प्रकल्प जाहीर करण्यात आले. पुणे ते शिरूर दरम्यान ५३ किलोमीटरचा मार्ग सुमारे ७,५१४ कोटी रुपयांच्या खर्चातून उभारला जाणार आहे. तसेच तळेगाव-चाकण मार्ग आणि चाकण-शिक्रापूर मार्गाचे सहापदरीकरण करण्यात येणार आहे. या प्रकल्पांमुळे औद्योगिक पट्ट्यातील वाहतूक अधिक वेगवान होईल.

याशिवाय शिरूर ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान १९२ किलोमीटरचा ग्रीनफिल्ड महामार्ग उभारण्याची योजना असून त्यासाठी जवळपास १४,८८६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पुणे आणि मुंबईला जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी मोठ्या गुंतवणुकीची घोषणा करण्यात आली आहे. सुमारे ५० अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीतून मीडिया-टेक आणि AVGC (ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स) क्षेत्रासाठी मोठे केंद्र उभारले जाणार आहे. या प्रकल्पामुळे अंदाजे ३० लाखांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

याशिवाय राज्यात सुमारे ४०० जागतिक क्षमता केंद्रे (GCC) आणि नवउपक्रम शहरांची उभारणी करण्याचाही सरकारचा मानस आहे. या उपक्रमांमुळे पुणे हे भविष्यातील तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचे महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

एकूणच यंदाच्या अर्थसंकल्पात पुण्याच्या वाहतूक व्यवस्था, उद्योग, तंत्रज्ञान, पर्यटन आणि पायाभूत सुविधांच्या विकासावर मोठा भर देण्यात आला असून शहराच्या दीर्घकालीन विकासाला चालना देण्याचा सरकारचा प्रयत्न दिसून येत आहे.

### पुरंदर विमानतळ प्रकल्पाला वेग

पुणे जिल्ह्यातील विमान वाहतुकीची वाढती गरज लक्षात घेता PURANDAR INTERNATIONAL AIRPORT प्रकल्पाला गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या विमानतळासाठी विशेष उद्देश वाहन (SPV) स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली आहे. यामुळे विमानतळाच्या उभारणीची प्रक्रिया अधिक वेगाने पुढे जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### पाणी आणि सिंचन प्रकल्प

पुणे जिल्ह्यातील काही भागांमध्ये पाण्याची टंचाई लक्षात घेता सिंचन प्रकल्पांवरही भर देण्यात आला आहे. बारामती आणि पुरंदर तालुक्यातील अवर्षणप्रवण भागांसाठी निरा–कर्हा नदीजोड प्रकल्प राबविण्याची घोषणा करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्याची शक्यता आहे.

# पुण्यात आंतरराज्य ‘सनी गँग’चा पर्दाफाश; 62 लाखांचे दागिने जप्त

**महाईन्यूज । पुणे**

**शहरात बंद सदनिकांचे कुलूप तोडून घरफोडी करणाऱ्या एका आंतरराज्य टोळीचा छडा लावण्यात विश्रामबाग पोलिसांना यश आले आहे. उत्तर प्रदेशातील कुख्यात ‘सनी गँग’शी संबंधित असलेला आणि खून, खुनाचा प्रयत्न तसेच ‘गँगस्टर ॲक्ट’नुसार गुन्हे दाखल असलेल्या या सराईत गुन्हेगारांकडून पोलिसांनी 62 लाखांचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त केले आहे.**




त्यांच्याकडून विश्रामबाग, खडक, समर्थ पोलिस ठाण्यातील एकूण 5 गुन्हे उघडकीस आणले आहेत. आकाश सुभाष (वय 23, रा. सुंदरनगरी, दिल्ली; मूळ रा. मेरठ, उत्तर प्रदेश), जितेंद्र चतुर्वेदी (वय 32, रा. सुंदरनगरी, दिल्ली) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. मुख्य आरोपी आकाश हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून, त्याच्यावर उत्तर प्रदेशातील गाजियाबाद, कोतवाली आणि इन्द्रापुरम पोलिस ठाण्यात खून, खुनाचा प्रयत्न आणि ‘गँगस्टर ॲक्ट’अंतर्गत गंभीर गुन्हे दाखल आहेत.

विश्रामबाग परिसरात जानेवारी महिन्यात एका घराचा दरवाजा तोडून चोरट्यांनी दागिने लांबविले होते. घटनेच्या तपासादरम्यान अंमलदार आशिष खरात आणि अनिस शेख यांनी शहरातील शंभरपेक्षा अधिक सीसीटीव्हींचे फुटेज तपासले. त्यावेळी आरोपींनी विश्रामबागसह शहरातील इतर भागांतही चोऱ्या केल्या असून, ते पुणे स्टेशनजवळील एका लॉजवर वास्तव्यास होते. तिथून ते परराज्यात पसार झाल्याचे समजले. दरम्यान, महिनाभरानंतर आरोपी हे पुन्हा घरफोडीच्या उद्देशाने ओंकारेश्वर मंदिर परिसरात येणार असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले.

त्यांनी चोरीचा माल रेल्वे स्टेशनजवळील लॉजमध्ये आणि काही माल दिल्ली-उत्तर प्रदेशात लपवल्याची कबुली दिली. पोलिसांनी उत्तर प्रदेशात जाऊन स्थानिक पोलिसांच्या मदतीने मुद्देमाल जप्त केला. परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त कृषिकेश रावले, वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रदीप कसबे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक राजेश उसगावकर, अंमलदार आशिष खरात, अनिस शेख, सचिन अहिवळे कैलास डुकरे, झाकीर मणियार, शिवदत्त गायकवाड यांच्यासह पथकाने ही कारवाई केली आहे.

# आळंदी तीर्थक्षेत्राच्या पायाभूत सुविधांसाठी पाठपुरावा

## आमदार महेश लांडगे यांची आढावा बैठक; शासनाकडे विविध मागण्या

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**श्रीक्षेत्र आळंदी तीर्थक्षेत्राच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत शहरातील मूलभूत समस्यांवर चर्चा करून त्यांचे त्वरित निवारण करण्यासाठी उपाययोजना ठरवण्यात आल्या.**



बैठकीत नियमित पाणीपुरवठा, स्वच्छता, बंद पथदिव्यांचे दुरुस्ती कामे, सांडपाणी वाहिन्यांचे नियमन आणि खराब रस्त्यांच्या दुरुस्तीवर सविस्तर चर्चा झाली. या सर्व बाबींसाठी नगरपालिकेच्या तांत्रिक टीमकडून सविस्तर अहवाल सादर करण्यात आला.

महेश लांडगे यांनी या मुद्द्यांवर राज्य शासनाकडे विविध मागण्यांचा प्रस्ताव पाठवण्याचे आदेश दिले असून, या मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी नियमित बैठकांचे आयोजन करण्याचे ठरले आहे. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी माधव खांडेकर, गटनेते सचिन गिलबिले तसेच सर्व नगरसेवक उपस्थित होते.

बैठकीत उपस्थित सर्वांनी शहराच्या विकासासाठी आळंदीकरांच्या मूलभूत समस्या प्राधान्याने सोडवण्याचा आणि स्वच्छ, सुबक व विकसित आळंदी घडवण्याचा संकल्प व्यक्त केला. याशिवाय, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीक्षेत्र आळंदीमध्ये ज्ञानपीठाची पायाभरणी होणार असून, आळंदीला “विकासाचे रोलमॉडेल” बनवण्याचा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

> आळंदीकरांच्या मूलभूत समस्या प्राधान्याने सोडवणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. नियमित पाणीपुरवठा, स्वच्छता, सांडपाणी नियमन आणि रस्त्यांच्या दुरुस्तीसह शहराचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत. आम्ही राज्य शासनाकडे सर्व आवश्यक मागण्यांचा पाठपुरावा करून आळंदीला 'विकासाचे रोलमॉडेल' बनवण्याचा संकल्प केला आहे.
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# पुणे जिल्हा भविष्यातील ‘ग्रोथ हब’; आमदार शंकर जगताप

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आजचा दिवस महाराष्ट्राच्या विकासाच्या प्रवासातील एक मैलाचा दगड ठरणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेला अर्थसंकल्प म्हणजे केवळ आर्थिक घोषणांचा दस्तऐवज नसून, तो विकसित महाराष्ट्राचा एक व्यापक आराखडा आहे. शाश्वत, सर्व समावेशक, प्रगतशील आणि सुशासन असा विकसित महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प या अर्थसंकल्पातून स्पष्टपणे दिसत आहे. ज्यामध्ये महापुरुषांचा आदर्श जतन करून विकसित महाराष्ट्राचा रोड मॅप तयार करण्याचा दूरदृष्टीकोन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडला आहे.**





> राज्याचा हा अर्थसंकल्प केवळ आर्थिक घोषणा नसून, ‘विकसित महाराष्ट्राचा’ सर्वसमावेशक आराखडा आहे. शाश्वत, सर्व समावेशक, प्रगतशील आणि सुशासन असा विकसित महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प आहे. पुण्याला ‘ग्रोथ हब’ बनवण्याचा संकल्प आणि पायाभूत सुविधांवरील भर जिल्ह्याला जागतिक ओळख मिळवून देईल. शेतकरी कर्जमाफी आणि तीर्थक्षेत्र विकास यातून सरकारने वारकरी संप्रदाय व बळीराजाचा सन्मान केला आहे. ५ दशलक्ष नोकऱ्यांचे उद्दिष्ट युवकांसाठी प्रगतीची नवी कवाडे उघडणारे ठरेल. खऱ्या अर्थाने हा अर्थसंकल्प प्रगत आणि सुशासनाकडे नेणारा गतिमान ‘रोडमॅप’ आहे.
> – शंकर जगताप, आमदार.

मुंबई महानगराच्या धर्तीवर आता पुणे, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर ही शहरे ‘ग्रोथ हब’ म्हणून नावारूपास येणार आहेत. यामुळे पुणे जिल्ह्याला जागतिक पातळीवर एक नवी आणि आधुनिक ओळख प्राप्त होईल,” असा विश्वास चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला.

या अर्थसंकल्पाचे स्वागत करताना आमदार शंकर जगताप पुढे म्हणाले की, “महाराष्ट्र आज थेट परकीय गुंतवणुकीत (FDI) देशात अव्वल स्थानावर असून ‘वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट’ मध्येही राज्याने सुवर्णपदक पटकावले आहे. पुणे हे आधीच उद्योगांचे केंद्र आहे, मात्र आता ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स (AVGC) सारख्या अत्याधुनिक क्षेत्रात पुण्याला जागतिक स्तरावर नेण्याचे स्वप्न या अर्थसंकल्पातून साकार होणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात मोठे औद्योगिक समूह उभारण्याचा संकल्प राज्याच्या औद्योगिक भरभराटीला नवी दिशा देणारा ठरेल.’इन्वेस्ट महाराष्ट्र’ नावाचे एक डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित केले जात आहे, आणि प्रत्येक जिल्ह्यात लघु आणि मध्यम उद्योग केंद्र स्थापन केली जातील. या धोरणामुळे सुमारे ५ दशलक्ष नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

“शेतकरी आणि वारकरी संप्रदायासाठी घेतलेल्या निर्णयांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना आमदार जगताप म्हणाले, “बळीराजाला आधार देण्यासाठी सरकारने ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना’ जाहीर करून ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतचे २ लाख रुपयांपर्यंतचे थकीत कर्ज माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. तसेच, जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची जन्मभूमी असलेल्या देहू येथील विकास आराखड्याची अंमलबजावणी करण्याचा घेतलेला संकल्प हा वारकरी संप्रदायाचा सन्मान करणारा आहे. जलयुक्त शिवार आणि वैरण विकासावर दिलेला भर कृषी क्षेत्राला नवा आयाम देईल.

“पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक कोंडीवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, “शहरातील वाहतुकीचा प्रश्न सोडवण्यासाठी मुंबईच्या धर्तीवर पुण्यातही भुयारी मार्ग (SUBWAY) आणि उन्नत मार्गांचे जाळे उभारले जाणार आहे. पाच ज्योतिर्लिंग क्षेत्रांचा विकास हे या बजेटचे खास वैशिष्ट्य आहे. याशिवाय, सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी ३१ सायबर गुन्हे महामंडळ, दिव्यांगांसाठी स्वतंत्र कौशल्य विकास केंद्रे आणि प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजनेतील महाराष्ट्राची उत्तुंग कामगिरी हे निर्णय राज्याला प्रगत बनवणारे आहेत.”आयुष्यमान भारत, शिवसृष्टी आणि शहरी आरोग्य आयुक्तालय यांसारख्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या आरोग्याची आणि संस्कृतीची जपणूक करणारा हा अर्थसंकल्प ‘सर्वसमावेशक विकास’ साधणारा असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी नमूद केले.

आमदार शंकर जगताप म्हणाले पुणे जिल्ह्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे. यामध्ये पुणे-शिरूर ५३ किमी लांबीच्या उन्नत मार्गासाठी ७,५१४ कोटी रुपये आणि तळेगाव-चाकण २५ किमी उन्नत मार्गासाठी ६,४९९ कोटी रुपयांची मोठी तरतूद करण्यात आली आहे. तसेच, चाकण-शिक्रापूर दरम्यानच्या २८ किमी रस्त्याचे ५,२३२ कोटी रुपये खर्चून सहापदरीकरण करण्यात येणार असून, शिरूर ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान १९२ किमीचा नवीन ग्रीनफील्ड महामार्ग उभारला जाणार आहे, ज्याचा अंदाजित खर्च १४,८८६ कोटी रुपये आहे. हडपसर ते यवत दरम्यानच्या ३१.५० किमी सहापदरी रस्त्यामुळे पुण्याबाहेरील वाहतूक अधिक सुलभ होईल. केवळ शहरेच नव्हे, तर ग्रामीण भागातील १००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रीट रस्त्यांनी जोडण्यासाठी आशियाई बँकेच्या मदतीने ४,५०० कोटींचा प्रकल्प राबवला जाणार आहे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल. पुणे लोणावळा रेल्वे महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग आणि अटल सेतू यांना जोडणारा उन्नत मार्ग फेब्रुवारी २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

# अपूर्ण कर्जमाफी : शेतकऱ्यांच्या अपेक्षांचा प्रश्न



## भूमिका

**राज्याच्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा केली असली तरी ती संपूर्ण कर्जमुक्ती नसल्यामुळे शेतकरी वर्गात समाधानापेक्षा संभ्रम आणि नाराजीची भावना दिसून येत आहे. निवडणुकांच्या काळात महायुतीने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते.**

त्यामुळे राज्यातील लाखो शेतकरी या निर्णयाची आतुरतेने वाट पाहत होते. परंतु अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेली दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी ही त्या आश्वासनाच्या तुलनेत मर्यादित असल्याचे स्पष्ट होते.




राज्यातील शेती आज अनेक अडचणींनी वेढलेली आहे. अनियमित पाऊस, दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे शेतीचे नुकसान वारंवार होते. त्याचबरोबर बियाणे, खत, कीटकनाशके आणि मजुरी यांचा वाढलेला खर्च शेतकऱ्यांसाठी मोठे ओझे ठरत आहे. उत्पादन वाढले तरी बाजारात योग्य दर मिळत नाहीत. परिणामी शेतकऱ्यांना कर्ज घेणे अपरिहार्य ठरते आणि हळूहळू कर्जबाजारीपणाचे दुष्टचक्र निर्माण होते. अशा परिस्थितीत संपूर्ण कर्जमाफीची अपेक्षा शेतकरी करत होते. मात्र दोन लाख रुपयांपर्यंतची मर्यादा ठेवल्यामुळे अनेक शेतकरी या योजनेतून वंचित राहण्याची शक्यता आहे.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' या नावाने ही योजना राबवली जाणार असून ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीककर्ज थकित असलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची घोषणाही करण्यात आली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय सकारात्मक असला तरी यामुळे शेती क्षेत्रातील मूलभूत प्रश्न सुटतील, असे म्हणणे कठीण आहे.

कर्जमाफी ही तात्पुरती दिलासा देणारी उपाययोजना असते, कायमस्वरूपी समाधान नव्हे. वारंवार कर्जमाफी जाहीर केल्यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर ताण येतो, तसेच बँकिंग व्यवस्थेवरही त्याचा परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना वारंवार कर्जमाफीची गरज पडू नये, यासाठी शेती क्षेत्रात मूलभूत सुधारणा करणे आवश्यक आहे. सिंचन सुविधांचा विस्तार, शेतीमालाला हमीभाव, साठवणूक आणि प्रक्रिया उद्योगांची उभारणी, बाजारपेठेची उपलब्धता आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर यांसारख्या उपाययोजनांवर अधिक भर देणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने ठोस धोरणे राबवली गेली तरच कर्जबाजारीपणाची समस्या कमी होऊ शकते.

दरम्यान, संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन देऊन सत्तेत आलेल्या सरकारने मर्यादित कर्जमाफी जाहीर केल्यामुळे विरोधकांना सरकारवर टीका करण्याची संधी मिळाली आहे. शेतकरी संघटनांनीही या निर्णयावर नाराजी व्यक्त केली असून पुढील काळात आंदोलनाची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सरकारसमोर शेतकऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे तसेच आर्थिक शिस्त राखण्याचे दुहेरी आव्हान उभे आहे.

एकूणच पाहता, कर्जमाफीची घोषणा ही काही प्रमाणात दिलासा देणारी असली तरी ती शेतकऱ्यांच्या अपेक्षांनुसार नाही. शेतकऱ्यांच्या समस्यांचे खरे समाधान तात्पुरत्या कर्जमाफीमध्ये नसून शेतीला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणाऱ्या दीर्घकालीन आणि परिणामकारक धोरणांमध्ये आहे. सरकारने या दिशेने ठोस पावले उचलली तरच शेतकरी खऱ्या अर्थाने कर्जमुक्त आणि आत्मनिर्भर होऊ शकतील.

## प्रासंगिक »

### गर्विष्ठ मेणबत्ती

***एकदा एका गृहस्थाने आपल्या मित्रांना मेजवानीसाठी बोलाविले होते.***

सगळेजण दिवाणखान्यात एका मोठया मेणबत्तीच्या प्रकाशात जेवत होते, ते पाहून मेणबत्तीला स्वत:चा अभिमान वाटला, आपल्या प्रकाशाचा केवढा उपयोग आहे असे वाटून ती गर्वाने म्हणाली, "ज्या वेळी व ज्या ठिकाणी सूर्यचंद्राचा प्रकाश पोहोचू शकत नाही. त्या वेळी व त्या स्थळी माझा प्रकाश पडू शकतो, चंद्रसूर्यही माझ्यापुढेही क्षुद्र वाटतात.' तिचे हे गर्वाचे बोलणे ऐकून जेवणारी मंडळी हसली. त्यातला एक जण उठला. त्याने खिडकी उघडली. त्याबरोबर हवेची झुळूक आली व मेणबत्ती विझली. नंतर त्याने पुन्हा खिडकी बंद केली व मेणबत्ती पेटविली. मग तो गृहस्थ मेणबत्तीला म्हणाला, 'अगं वेडे आता तरी प्रकाश दे, एवढयाशा झुळकेने विझतेस, चंद्रसूर्याला क्षुद्र समजतेस त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ असल्याची मिजास करतेस. चंद्रसूर्य कधी तुझ्यासारखे वाऱ्याच्या झुळकेने विझून गेले आहेत का?'

तात्पर्य : आपल्यावर सोपवलेली कामगिरी व्यवस्थितपणे पार पाडण्यातच मोठेपण आहे.

जगातील युद्धे ही केवळ राजकीय किंवा लष्करी संघर्ष नसून ती मानवी जीवनाबरोबरच पर्यावरणासाठीही अत्यंत घातक ठरतात. सध्या अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात निर्माण झालेल्या तणावामुळे पश्चिम आशियातील परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

# युद्धांचे पर्यावरणीय दुष्परिणाम



क्षेपणास्त्र हल्ले, लष्करी कारवाया आणि प्रतिहल्ल्यांमुळे केवळ मानवी जीवितहानी होत नाही, तर नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास होऊन पर्यावरणीय संकटेही वाढतात. हा संघर्ष दीर्घकाळ चालला तर त्याचे दुष्परिणाम जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा पुरवठा आणि हवामान व्यवस्थेवरही पडू शकतात.

इतिहासातही युद्धांनी पर्यावरणावर गंभीर परिणाम घडवून आणले आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी अमेरिकेने जपानमधील हिरोशिमा आणि नागासाकी येथे अणुबॉम्ब टाकल्यानंतर तेथील परिसंस्था अनेक दशकांपर्यंत प्रभावित राहिल्या. लाखो लोकांचा मृत्यू झाला आणि विकिरणामुळे पुढील पिढ्यांनाही विविध आजारांना सामोरे जावे लागले. त्यानंतर व्हिएतनाम युद्धात वापरलेल्या रासायनिक तृणनाशकांमुळे मोठ्या प्रमाणावर जंगलांचे नुकसान झाले आणि तेथील जैवविविधतेला दीर्घकालीन फटका बसला. युद्धांमुळे शहरांवर होणारे बॉम्बहल्ले, आगी आणि स्फोट यामुळे हवा, पाणी आणि मृदा प्रदूषणात वाढ होते. सल्फर डायऑक्साइड, नायट्रोजन डायऑक्साइड यांसारख्या वायूंचे प्रमाण वाढल्याने श्वसनविकार, हृदयरोग आणि फुफ्फुसांचे आजार वाढतात. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर लोकांचे विस्थापन होत असल्याने निर्वासित छावण्यांसाठी जंगलांची तोड केली जाते, जलस्रोतांवर ताण येतो आणि स्थानिक परिसंस्था असंतुलित होतात.

ऊर्जास्रोतांवरही युद्धाचा मोठा परिणाम होतो. आखाती प्रदेशातील संघर्षामुळे तेल व नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होतात. हॉर्मुजच्या सामुद्रधुनीतून होणारी तेलवाहतूक थांबली तर भारतासारख्या देशांवर त्याचा मोठा आर्थिक परिणाम होऊ शकतो. ऊर्जा टंचाईमुळे औद्योगिक उत्पादन घटते, महागाई वाढते आणि दारिद्र्य व कुपोषणासारख्या सामाजिक समस्या तीव्र होतात.

युद्धामुळे सागरी परिसंस्थांनाही फटका बसतो. सागरी मार्गांवर होणारे स्फोट, जहाजांवरील हल्ले आणि तेलगळती यामुळे मत्स्यसंपदा व प्रवाळभित्ती धोक्यात येतात. 1991 च्या आखाती युद्धात कुवेतमधील तेलविहिरींना लावलेल्या आगीमुळे सहा महिने धूर पसरून हवा व जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले होते. ही घटना पर्यावरणीय आपत्तीचे भयावह उदाहरण मानली जाते.

आजच्या काळात हवामान बदलाचे संकट आधीच गंभीर असताना युद्धांमुळे हरितगृह वायूंचे उत्सर्जन वाढते आणि पर्यावरणीय समस्या अधिक गुंतागुंतीच्या बनतात. त्यामुळे जागतिक शांतता ही केवळ राजकीय स्थैर्यासाठी नव्हे तर पृथ्वीच्या पर्यावरणीय संतुलनासाठीही अत्यावश्यक आहे. युद्धाच्या मार्गाऐवजी संवाद आणि सहकार्याचा मार्ग स्वीकारणे हीच आजच्या जगाची खरी गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



शिकविलें तुम्हीं तें राहे तोंवरी ।
मज आणि हरी वियोग तों ॥१॥

प्रसंगीं या नाहीं देहाची भावना ।
तेथें या वचना कोण मानी ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शासनाकडून एसटी महामंडळाला ५०० कोटी

## सवलतीच्या योजनांसाठी एसटीला निधी; कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न सुटला

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्य शासनाने राज्य परिवहन (एसटी) महामंडळाला जानेवारी २०२६ चे सवलतमूल्य उपलब्ध केले आहे. राज्य शासनाने शुक्रवारी ५०० कोटी रुपये एसटी महामंडळाला देण्यास मान्यता दिली. एसटी महामंडळाला कर्मचाऱ्यांचे वेतन, इतर देणी देण्यासाठी राज्य शासनावर अवलंबून राहावे लागते. जानेवारी महिन्याचे सवलतमूल्य उपलब्ध करण्याबाबत एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांनी राज्य शासनाला विनंती केली होती.**



त्याअनुषंगाने राज्य शासनाकडून एसटी महामंडळाला जानेवारी महिन्याच्या सवलतमूल्याची प्रतिपूर्ती म्हणून आवश्यक निधी वितरित करण्यात आला आहे. या आर्थिक मदतीमुळे एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित वेतनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागला असून कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर वेतनासाठी राज्य शासनाकडून मिळणारा निधी एसटी महामंडळासाठी महत्त्वाचा आधार ठरत आहे. या निधीमुळे केवळ कर्मचाऱ्यांचे वेतनच नव्हे, तर महामंडळाच्या दैनंदिन कामकाजालाही काही प्रमाणात आर्थिक स्थैर्य मिळण्यास मदत होत आहे.

राज्य सरकारने एसटी महामंडळाच्या माध्यमातून प्रवास करणाऱ्या राज्यातील हजारो प्रवाशांसाठी विविध प्रकारच्या सवलतीच्या योजना जाहीर केल्या आहेत. या सवलतीच्या योजना समाजातील विविध घटकांना दिलासा देण्यासाठी राबवण्यात येत असून त्या एसटी महामंडळाच्या बस सेवांमधून प्रवाशांना दिल्या जातात. या सवलतींची आर्थिक जबाबदारी व उत्तरदायित्व राज्य सरकारकडून स्वीकारले गेले आहे. महिला प्रवाशांना राज्यातील सर्व एसटी बस सेवांमध्ये ५० टक्के प्रवास सवलत देण्यात येते, ज्यामुळे महिलांच्या प्रवासाला मोठा आधार मिळत आहे. तसेच ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलतीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना एसटी बसमधून मोफत प्रवासाची विशेष सुविधा दिली जाते.

अंध व अपंग व्यक्तींना साध्या तसेच निमआराम बस सेवांमध्ये ५० टक्के सवलत दिली जाते, ज्यामुळे त्यांना प्रवास करताना आर्थिक दिलासा मिळतो. तसेच शालेय विद्यार्थी, स्वातंत्र्यसैनिक, माजी तसेच विद्यमान विधिमंडळ सदस्य यांनाही विविध सवलतींचा लाभ दिला जातो. या सर्व सवलतींच्या योजनांमुळे एसटी महामंडळावर येणाऱ्या आर्थिक भाराची भरपाई करण्यासाठी त्या सवलतींच्या मूल्याची प्रतिपूर्ती तसेच त्यातील फरकाची रक्कम राज्य सरकारकडून दिली जाते. त्यामुळे एसटी महामंडळाला प्रवाशांना सवलती देताना आर्थिक अडचणी कमी करण्यास मदत होते आणि राज्यातील नागरिकांना स्वस्त व सुलभ सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध राहते.

# रस्त्याचे काम पूर्ण होण्यापूर्वीच पथकर वसुलीची तयारी

**महाईन्यूज । अलिबाग**

**मुंबई-गोवा महामार्गावरील नागोठणे आणि कोलाड येथील पुलांची कामे वगळली तर पळस्पे ते इंदापूर टप्प्यातील महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. काम पूर्ण होण्याआधीच पथकर नाके कार्यान्वित करण्यासाठी प्रशासनाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. येत्या आठवड्याभरात त्याबाबत अधिसूचना जारी होणार असल्याची माहिती महामार्ग प्राधिकरणाने दिली आहे.**



> महामार्गाचे पहिल्या टप्प्यातील काम जवळपास पूर्ण झाले आहे. त्यामुळे किरकोळ कामे शिल्लक आहेत. त्यामुळे पथकर नाके आठवड्याभरात कार्यान्वित केले जाऊ शकतात. अधिसूचना प्रसिद्ध झाल्यावर तो किती असेल हे स्पष्ट होईल.
>
> \- रवींद्र इंगुले, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पनवेल

मुंबई-गोवा महामार्गाच्या पहिल्या टप्प्यातील पळस्पे ते इंदापूर या महत्त्वाच्या मार्गाचे चौपदरीकरण आणि रुंदीकरण करण्याचे काम २०११ साली सुरू करण्यात आले होते. कोकण आणि मुंबई यांना जोडणारा हा अत्यंत महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग असल्यामुळे या प्रकल्पाकडे सुरुवातीपासूनच मोठ्या अपेक्षेने पाहिले जात होते. मात्र विविध प्रशासकीय, आर्थिक आणि तांत्रिक कारणांमुळे या प्रकल्पाचे काम अनेक वर्षे रखडत गेले. निधीची कमतरता, पर्यावरणविषयक परवानग्या मिळण्यात आलेल्या अडचणी, भूसंपादनासंदर्भातील गुंतागुंतीचे प्रश्न तसेच ठेकेदाराच्या कामातील निष्क्रियता यांसारख्या कारणांमुळे या महामार्गाचे काम वेळोवेळी विलंबित झाले. परिणामी, हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी तब्बल पंधरा वर्षांचा कालावधी लागला. या कालावधीत स्थानिक नागरिक, वाहनचालक आणि व्यापारी वर्गाला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. खराब रस्ते, वाहतुकीची कोंडी, अपघातांची शक्यता आणि प्रवासाला लागणारा वाढलेला वेळ यामुळे नागरिकांकडून सातत्याने नाराजी व्यक्त केली जात होती.

मात्र आता दीर्घ प्रतीक्षेनंतर या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले असून येत्या मे महिन्याच्या अखेरीपर्यंत हे काम पूर्ण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या कोलाड आणि नागोठणे येथील काही पुलांची कामे वगळता बहुतांश कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. अनेक ठिकाणी डांबरीकरण, रस्त्याचे मजबुतीकरण, सुरक्षा उपाययोजना तसेच रस्त्यालगत आवश्यक असलेल्या सुविधांची उभारणी पूर्ण करण्यात आली आहे. त्यामुळे हा महामार्ग लवकरच पूर्ण क्षमतेने वाहतुकीसाठी खुला होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, महामार्गाचे काम जवळपास पूर्णत्वास येत असतानाच पथकर नाके कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून हालचालींना वेग आला आहे. रस्त्याचे संपूर्ण काम पूर्ण होण्यापूर्वीच टोल वसुलीची तयारी सुरू झाल्यामुळे काही वाहनचालक आणि नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात खारपाडा आणि खांब या दोन ठिकाणी पथकर आकारला जाणार आहे. या दोन्ही ठिकाणी टोल नाके उभारण्याचे काम सध्या वेगाने सुरू असून आवश्यक पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत. टोल प्लाझासाठी जागा तयार करणे, बूथ उभारणे, वाहनांच्या हालचालीसाठी मार्ग तयार करणे तसेच तांत्रिक यंत्रणा बसवण्याचे काम सुरू आहे. तसेच या महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्यात पोलादपूरजवळील लोहारे येथे आणखी एक पथकर नाका उभारण्यात येणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे भविष्यात या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना या तीन ठिकाणी पथकर भरावा लागू शकतो.

मात्र या मार्गावरील पथकराची रक्कम नेमकी किती असेल, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही. महामार्ग प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या आठवड्यात टोल संदर्भातील अधिकृत अधिसूचना प्रसिद्ध केली जाणार आहे. त्या अधिसूचनेनंतर विविध प्रकारच्या वाहनांसाठी किती टोल आकारला जाणार आहे, तसेच टोल आकारणीची अंमलबजावणी नेमकी कधीपासून सुरू होणार आहे, याचे स्पष्ट चित्र समोर येईल. त्यामुळे या मार्गावरून नियमित प्रवास करणाऱ्या वाहनचालकांचे तसेच स्थानिक नागरिकांचे लक्ष सध्या या अधिसूचनेकडे लागले आहे.

# सुखोई विमान अपघातात महाराष्ट्राच्या वैमानिकाचा मृत्यू

## फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर आणि लेफ्टनंट अनुज यांचा दुर्दैवी मृत्यू

**महाईन्यूज । नागपूर**

**भारतीय हवाई दलाच्या सुखोई-३० एमकेआय लढाऊ विमानाचा गुरुवारी आसाममध्ये अपघात झाला. या अपघातात स्क्वाड्रन लेफ्टनंट अनुज आणि फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर या दोन वैमानिकांचा मृत्यू झाला. पूर्वेश दुरगकर हे मूळचे नागपूर महाराष्ट्रातील होते. गेल्यावर्षी भारताच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. दहा दिवसांपूर्वीच पूर्वेश दुरगकर कुटुंबियांना भेटून पुन्हा कर्तव्यावर रुजू झाले होते.**



पूर्वेश यांचे वडील मुलाबाबत बोलताना भावूक झाले. “पूर्वेश भारतीय हवाई दलाचा भाग होता याचा त्याला खूप अभिमान होता. लढाऊ विमान उडवणे त्याला खूप अभिमानाचे वाटायचे. आसाममधील तेजपूरमध्ये त्याचे मूळ पोस्टींग होते पण तिथं धावपट्टीचे काम सुरु असल्याने तो जोरहट येथून काम करत होता. देशासाठी त्याने सर्वोच्च बलिदान दिले आहे, युवकांनी त्याच्याकडून प्रेरणा घ्यावी”, असे त्यांचे वडील पीटीआयशी बोलताना म्हणाले. पू २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला उत्तर म्हणून भारताने ०७ मे रोजी ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानमधील दहशतवादी तळ उद्धवस्त केले होते. भारताने लष्कर – ए- तैयबाचे तळ उद्धवस्त केले होते, यात १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा झाला होता. पाकिस्तानकडून देखील या प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला पण, भारताने हे हल्ले यशस्वीपणे परतावून लावले. यानंतर १० मे रोजी पाकिस्तानकडून सीझफायर करण्याची विनंती करण्यात आली. वेंश दहा दिवसांपूर्वीच कुटुंबियांना भेटण्यासाठी नागपूरला आले होते. त्यांचे सर्व शिक्षण नागपूरमधून झाले होते. २८ वर्षीय पूर्वेश यांचे लग्न नव्हते झाले. त्यांच्या मृत्यू पश्चात आई-वडील, बहीण असा परिवार आहे.

### एमकेआय लढाऊ विमानाचा अपघात

स्क्वाड्रन लेफ्टनंट अनुज आणि फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर सुखोई-३० एमकेआय लढाऊ विमानाचा सराव करत असताना विमान बेपत्ता झाले. जोरहट विमानतळावरून उड्डाण घेतल्यानंतर विमानाचा रडारशी संपर्क तुटला. विमानतळापासून ६० किलोमीटरच्या अंतरावर विमानाचा अपघात झाला व त्यात दोघांचाही मृत्यू झाला. उड्डाणानंतर ७.४२ वाजता त्याचा संपर्क तुटला अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

### ऑपरेशन सिंदूरमध्ये सहभाग

फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर यांनी पाकिस्तानविरुद्ध राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये सहभाग घेतला होता. महत्वाची बाब म्हणजे पूर्वेश ऑपरेशनचा हिस्सा होता याची कल्पना कुटुंबियांना देखील नव्हती. १५ दिवसांनी ऑपरेशन पूर्ण झाल्यानंतर कुटुंबीयांना तो याचा हिस्सा असल्याची माहिती देण्यात आली. “ऑपरेशनदरम्यान त्याच्याकडे फोन नव्हता त्यामुळे संपर्क करता आला नाही. १५ दिवसांनी आम्हाला याची कल्पना देण्यात आली”, असे पूर्वेशच्या कुटुंबियांनी पीटीआय वृत्तसंस्थेला सांगितले.

# कर्नाटक सरकारचा निर्णय; १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी

**महाईन्यूज । कर्नाटक**

**सोशल मीडियाचा वापर वाढला असून आता सर्वच वयोगटातील लोक याच्या आहारी गेलेले दिसतात. विशेषतः लहान मुलांवर याचे दुष्परिणाम दिसून येत आहेत. यानंतर लहान मुलांना सोशल मीडियापासून दूर ठेवण्याची गरज अनेकांनी बोलून दाखवली होती. कर्नाटक राज्याने याबद्दल पुढाकार घेतला असून शुक्रवारी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर बंदी असेल, अशी घोषणा केली.**




कर्नाटक सरकारकडून २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ४.४८ लाख कोटींचा अर्थसंकल्प सादर केला आहे. तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण उपक्रम आणि मुलांना ऑनलाईन धोक्यांपासून सुरक्षित करण्यासाठी नियामक उपायांचा समावेश अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. या निर्णयाबाबत बोलत असताना मुख्यमंत्री सिद्धरामय्या म्हणाले की, वाढत्या मोबाइल वापरामुळे मुलांवर होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्यात येत आहे.

या नियमाची अंमलबजावणी जेव्हा होईल, तेव्हा असे नियमन करणारे कर्नाटक हे पहिले राज्य असेल. सोशल मीडियाच्या अतिरिक्त वापरामुळे मानसिक आरोग्य, झोप आणि सुरक्षेवर परिणाम होत असल्याबाबत जागतिक पातळीवर चिंता व्यक्त करण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

डिसेंबर २०२५ मध्ये ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरापासून बंदी घातली. काही युरोपियन देशांनीही अशाचप्रकारची पावले उचलली आहेत.

ब्रिटननेही १६ वर्षांखालील मुलांसाठी गेमिंग प्लॅटफॉर्म आणि एआयच्या वापरावर बंदी घालण्याबाबत पालक आणि मुलांची मते मागितली आहेत. उच्च शिक्षण दर्जेदार करण्यासाठीही राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी संस्थांचा विस्तार आणि रिक्त असलेल्या जागा भरण्याची योजना सरकार आखत आहे. बंगळुरूमधील विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी विद्यापीठाला आयआयटीच्या धर्तीवर विकासासाठी ५०० कोटी मिळणार आहेत, ज्यामध्ये चालू आर्थिक वर्षात १०० कोटींची तरतूद करण्यात येत आहे.

### कर्नाटक उच्च न्यायालयाने दिली होती सूचना

समाजमाध्यमांचा वापर करण्यासाठी सरकारने वयोमर्यादा निश्चित करण्याचा विचार करावा अशी सूचना कर्नाटक उच्च न्यायालयाने यापूर्वी २०२३ मध्ये केली होती. मद्यपान करण्यासाठी वयोमर्यादा आखून देण्यात आली आहे, त्याचप्रमाणे याचा विचार व्हावा असे न्या. जी नरेंदर आणि न्या. विजयकुमार पाटील यांच्या खंडपीठाने सुचवले होते.

### अर्थसंकल्पात शिक्षणसाठी मोठी तरतूद

मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित शिक्षण प्रणाली अर्थसंकल्पात प्रस्तावित केली. याबद्दल माहिती देताना ते म्हणाले की, राज्य सरकार आयआयटी धारवाडच्या सहकार्याने विकसित केलेली डिजिटल ट्युटोरिंग प्रणाली सुरू करेल, जी इयत्ता ८ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना फायदेशीर ठरेल. या उपक्रमाचा सुमारे एक कोटी २२ लाख विद्यार्थ्यांना फायदा होण्याची अपेक्षा आहे आणि यासाठी अंदाजे ५ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

# एक 'लाइक'मुळे झाला राडा.!



सोशल मीडियावर कधी-कधी
होतो. सध्या असाच
यामी गौतम यांच्यात सुरु
एका रीलला यामी गौतमने
दोघींमध्ये 'कोल्ड वॉर'
आता यामीने स्वतः पुढे
वादाची

तो

लक्ष

लिहिलं
मोह
प्रतिष्ठेचा
एक
टीम
आहे.या
REPORTER'
आली आहे. त्या
सोहळ्यांविषयी
मांडलं होतं. ती
आता वॅलिडेशन
पुरस्कार मिळाला म्हणून
आणि नाही मिळाला म्हणून
असा अर्थ होत नाही. फिल्म इंडस्ट्री इतकी
सोपी नसते." असं ती यावेळी म्हणाली होती.

अगदी छोट्या गोष्टीवरूनही मोठा वाद निर्माण
एक वाद अभिनेत्री क्रिती सनॉन आणि अभिनेत्री
असल्याचं दिसून येत आहे. इन्स्टाग्रामवरील
(YAMI GAUTAM) केलेल्या 'लाइक'मुळे
सुरू असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. मात्र
येत या प्रकरणावर स्पष्टीकरण दिलं आहे.
सुरुवात कशी झाली? हा संपूर्ण वाद एका
इन्स्टाग्राम रीलपासून सुरू झाला. या
रीलमध्ये एका बाजूला क्रिती सनॉन तिच्या
'तेरे इश्क में' या चित्रपटातील भूमिकेसाठी
मिळालेला 'झी सिने पुरस्कार' हातात घेऊन आनंद
व्यक्त करताना दिसत होती. दुसऱ्या बाजूला यामी गौतमच्या
जुन्या मुलाखतीतील एक विधान दाखवण्यात आलं होतं.
या व्हिडिओमध्ये क्रितीच्या 'तेरे इश्क में' आणि यामीच्या 'हक' या
चित्रपटांची तुलना करण्यात आली होती आणि क्रितीला मिळालेल्या
पुरस्कारावरही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. याच रीलला
यामी गौतमने 'लाइक' केल्याचं चाहत्यांच्या लक्षात आलं. त्यानंतर
सोशल मीडियावर कमेंट्सचा अक्षरशः पाऊस पडला. काहींनी
याला यामीचा स्पष्टपणा म्हटलं, तर काहींनी हा क्रितीविरोधातील
'पीआर स्टंट' असल्याची टीका केली.वाद वाढत असल्याचं
पाहून अखेर यामी गौतमने तिच्या एक्स (ट्विटर) अकाऊंटवर
पोस्ट लिहित या प्रकरणावर स्पष्टीकरण दिलं. तिने लिहिलं
की, "माझ्या निदर्शनास आलं आहे की मी इन्स्टाग्रामवरील
एक रील लाइक केली, ज्यामध्ये दुसऱ्या अभिनेत्रीबद्दल
नकारात्मकता दाखवली गेली आहे. आम्हाला दररोज अनेक
पोस्टमध्ये टॅग केलं जातं. त्या रीलमध्येही मला टॅग करण्यात
आलं होतं. तो लाइक जाणीवपूर्वक केलेला नव्हता; कदाचित
चुकून क्लिक झाला असेल. मी कधीही खालच्या पातळीच्या
पीआर युक्त्या वापरल्या नाहीत. मी नेहमी माझ्या कामावर
केंद्रीत केलं आहे आणि पुढेही तसंच करणार आहे." असं
अभिनेत्री म्हणली आहे.यामीने तिच्या पोस्टमध्ये सोशल
मीडियावरील 'क्लिकबेट' संस्कृतीवरही भाष्य केलं. तिने
की, आजकाल छोट्या गोष्टींचाही मोठा गॉसिप बनवण्याचा
अनेकांना आवरत नाही. मात्र लोकांनी तिच्या काम आणि
विचार करावा, अशी अपेक्षा तिने व्यक्त केली. तिने आणखी
महत्त्वाची बाब सांगितली की तिच्याकडे कोणतीही पीआर
नाही आणि ती फक्त आपल्या कामावर लक्ष केंद्रित करत
वादाच्या पार्श्वभूमीवर यामी गौतमने 'THE HOLLYWOOD
ला दिलेली जुनी मुलाखतही चर्चेत
मुलाखतीत तिने पुरस्कार
आपलं स्पष्ट मत
म्हणाली होती, "मी
मागणं सोडलं आहे.
मी चांगली अभिनेत्री
मी चांगली नाही,

## "आम्ही फक्त एडिट केलेलं आयुष्य दाखवतो"



सोशल मीडियावर 'यूके०७ रायडर' म्हणून ओळखला जाणारा यूट्यूबर अनुराग डोभाल सध्या मानसिक तणावातून जात असल्याची चर्चा सुरू असून त्याने अलीकडेच जवळपास दोन तासांचा व्हिडिओ शेअर करत कुटुंबाकडून होत असलेल्या छळाबद्दल गंभीर आरोप केले आहेत. या व्हिडिओमध्ये त्याने आई-वडील, भाऊ आणि काही नातेवाईकांवर आंतरजातीय लग्नामुळे त्याला स्वीकारले नाही आणि सतत त्रास दिल्याचा दावा केला आहे. तसेच ज्या पत्नीसाठी तो सर्वांच्या विरोधात उभा राहिला, तीही इतरांच्या प्रभावामुळे त्याला सोडून गेल्याचे त्याने सांगितले. सध्या तो मानसिकदृष्ट्या खूप तणावात असून काही दिवसांपासून नीट अन्नही घेत नसल्याचे त्याने म्हटले आहे आणि टोकाचे पाऊल उचलण्याचा इशाराही दिल्याने त्याचे चाहते चिंतेत पडले आहेत. या पार्श्वभूमीवर 'कोकण हार्टेड गर्ल' म्हणून ओळखली जाणारी अंकिता वालावलकर हिने सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर करत सोशल मीडियावर दिसणारे आयुष्य हे नेहमी पूर्ण सत्य नसते, कारण इन्फ्लुएन्सर्स बहुतेक वेळा फक्त आनंदी क्षणच दाखवतात, पण त्यामागील दुःख, ताण आणि संघर्ष लोकांसमोर येत नाहीत, असे स्पष्ट केले.

# झी सिने अवॉर्ड्स २०२६ मध्ये अनीत पड्डाचा दुहेरी सन्मान

झी सिने अवॉर्ड्स २०२६ मध्ये अभिनेत्री अनीत पड्डा (ANEET PADDA) हिने दुहेरी सन्मान मिळवत आपल्या करिअरमध्ये महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या पुरस्कार सोहळ्यात तिला बेस्ट डेब्यू फीमेल आणि व्ह्यूअर्स चॉइस बेस्ट अभिनेत्री असे दोन मोठे पुरस्कार मिळाले. पुरस्कार स्वीकारताना अनीत पड्डाने आपल्या वडिलांची आठवण काढत अत्यंत भावनिक भाषण केले. तिने सांगितले की, हा सन्मान तिच्या मेहनतीसोबतच तिच्या वडिलांच्या अपूर्ण स्वप्नाशी जोडलेला आहे.अनीत पड्डाने स्टेजवर बोलताना सांगितले की,



तिचे वडीलही एकेकाळी अभिनेता
त्यांचे ते स्वप्न पूर्ण होऊ शकले
तिच्यासाठी केवळ वैयक्तिक
झाल्याचा क्षण आहे. तिने
"माझ्या वडिलांना अभिनेता
होतं. ते त्यांना जमलं नाही,
त्यांच्या मुलीने ते स्वप्न पूर्ण
प्रसंगी अनीत पड्डाने आपल्या
भाषेतही खास संदेश दिला.
दिवस तिच्या आयुष्यातील
अभिमानास्पद क्षणांपैकी
शब्दांनी उपस्थित प्रेक्षकही
मिळाल्यानंतर अनीत पड्डाने
कथांच्या महत्त्वाबद्दलही
व्यक्त केले. तिच्या मते, जेव्हा
अभिनेत्याच्या अभिनयाला
प्रेक्षकांकडून टाळ्या मिळतात,
तेव्हा त्या टाळ्या केवळ त्या
कलाकारासाठी नसतात. त्या
त्या कथेसाठी, त्या पात्रासाठी
आणि त्या भावनांसाठी
असतात, ज्या पडद्यावर
जिवंत केल्या जातात.

बनण्याचे स्वप्न पाहत होते. मात्र काही कारणांमुळे
नाही. त्यामुळे आज मिळालेला हा सन्मान
यश नसून तिच्या वडिलांचे स्वप्न पूर्ण
सांगितले की,
व्हायचं
पण आज
केलं आहे."या
वडिलांना पंजाबी
तिने सांगितले की, आजचा
सर्वात भावनिक आणि
एक आहे. तिच्या या
भावुक झाले. पुरस्कार
अभिनय आणि
आपले मत
एखाद्या

# प्रियांका चोप्रा निभावणार मोठी जबाबदारी



बॉलीवूडची देसी गर्ल प्रियांका चोप्रा बऱ्याच केली आहे. ती आणि तिचा पती निक आनंदाची बातमी शेअर केली आहे.९८ व्या अकादमी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ही आनंदाची पोस्टमधून तिने आभार मानले आहेत. प्रियांकासोबत नावे आहेत. हे स्टार कलाकार विविध श्रेणींमध्ये ओव्हेशन येथील डॉल्बी थिएटरमध्ये करण्यात आले मीडियावरून पोस्ट शेअर केल्यानंतर इंडस्ट्रीतील मित्र प्रसिद्ध स्टँड-अप कॉमेडियन झाकीर खान यांनी मोठा चित्रपट सृष्टीतील पुरस्कार समजला जातो. दिग्दर्शक, अभिनेते आणि लेखकांना हे पुरस्कार एसएस राजामौली यांच्या "वाराणसी" चित्रपटात

काळापासून हॉलिवूड इंडस्ट्रीत काम करत आहे. तिने स्वतःची एक वेगळी ओळख या इंडस्ट्रीत तयार जोनास सतत कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असतात. आता सोशल मीडियावरून प्रियांकाने एक ऑस्कर पुरस्कारांसाठी सादरकर्त्यांच्या यादीत तिच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. अभिनेत्रीने स्वतः बातमी दिली आहे.प्रियांकाने इन्स्टाग्रामवरील पोस्टमध्ये "२०२६ अकादमी पुरस्कार." असे लिहिले आहे. या या यादीत रॉबर्ट डाउनी ज्युनियर, अँनी हॅथवे, विल अर्नेट, ग्वेनेथ पॅल्ट्रो आणि पॉल मेस्कल सारखी मोठी विजेत्यांना सन्मानित करतील. ९८ वा अकादमी पुरस्कार सोहळ्याचे आयोजन १६ मार्च रोजी हॉलिवूडमधील आहे. भारतीय वेळेनुसार पहाटे ४:३० वाजता पुरस्कार सोहळ्याला सुरुवात होणार आहे.प्रियांकाने सोशल आणि सहकलाकारांनी तिचे अभिनंदन करणाऱ्या कमेंट्स पोस्टच्या कमेंट्स सेक्शनमध्ये केल्या आहेत. "अभिनंदन. तू खरोखरच एक हिरा आहेस." अशी कमेंट केली आहे. ऑस्कर पुरस्कार हा जगात सर्वात दरवर्षी विविध विभागातून विजेत्यांना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. यामध्ये दरवर्षी चित्रपट क्षेत्रातील प्रदान केले जातात. १९२९ मध्ये पहिल्यांदा या पुरस्कार सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. प्रियांका झळकणार आहे. ती महेश बाबू आणि पृथ्वीराज सुकुमारन यांच्यासोबत स्क्रिन शेअर करणार आहे.

# अहमदाबादच्या खेळपट्टीवर मोठा सस्पेन्स!

## काळी माती की लाल मातीची; सामन्याचा रंग ठरवणार पिच

**महाईन्यूज । अहमदाबाद**

**विश्वचषकाची फायनल अवघ्या एका खेळपट्टीच्या रंगावर ठरणार आहे, हे तुम्हाला माहीत आहे का? रविवारी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर जेव्हा IND VS NZ T20 WORLD CUP 2026 FINAL चा थरार सुरू होईल, तेव्हा नजरा खेळाडूंपेक्षा खेळपट्टीवर जास्त असतील.**



जर सामना काळ्या मातीच्या (BLACK SOIL) खेळपट्टीवर खेळवला गेला, तर चेंडू बॅटवर अतिशय चांगल्या प्रकारे आणि सहजतेने येतो. अशा परिस्थितीत फलंदाजांना मोठे फटके मारणे सोपे जाते. त्यामुळे सध्या तुफान फॉर्ममध्ये असलेला भारताचा संजू सॅमसन आणि न्यूझीलंडचा आक्रमक फलंदाज फिन ॲलन हे दोघेही धावांचा अक्षरशः पाऊस पाडू शकतात. या प्रकारच्या खेळपट्टीवर फलंदाजांना भरपूर मदत मिळत असल्याने येथे २०० पेक्षा जास्त धावांचा मोठा स्कोर करणे अजिबात कठीण नसून तो सहज शक्य होऊ शकतो.

परंतु जर क्युरेटरने लाल मातीची (RED SOIL) खेळपट्टी निवडली, तर मात्र सामन्याचा चित्र पूर्णपणे बदलू शकतो. लाल मातीच्या पिचवर चेंडू अधिक टर्न घेतो आणि फिरकी गोलंदाजांना मोठी मदत मिळते. त्यामुळे अशा परिस्थितीत फिरकीपटूंची अक्षरशः चांदी होण्याची शक्यता असते. भारताचा कुलदीप यादव किंवा न्यूझीलंडचा अनुभवी फिरकी गोलंदाज मिचेल सँटनर हे फलंदाजांना आपल्या फिरकीने अडचणीत टाकू शकतात आणि त्यांची भंबेरी उडवू शकतात.

याशिवाय या सामन्यात आणखी एक महत्त्वाचा आणि निर्णायक घटक आहे तो म्हणजे 'दव' (DEW FACTOR). संध्याकाळी ७ वाजता सुरू होणारा हा डे-नाईट सामना असल्यामुळे दुसऱ्या डावात दव पडण्याची दाट शक्यता असते. मैदानावर दव पडल्यावर चेंडू ओला होतो आणि गोलंदाजांना तो व्यवस्थित ग्रिप करणे कठीण जाते. त्यामुळे गोलंदाजांसाठी परिस्थिती अधिक आव्हानात्मक बनते, तर फलंदाजांना फटके मारणे तुलनेने सोपे होते.

थोडक्यात सांगायचे झाल्यास, या सामन्यात 'टॉस' हाच खरा गेमचेंजर ठरणार आहे. जो कर्णधार नाणेफेक जिंकेल, तो जवळजवळ डोळे झाकून आधी गोलंदाजी करण्याचा निर्णय घेण्याची शक्यता आहे आणि लक्ष्याचा पाठलाग करणे पसंत करेल. आता तब्बल १ लाख ३२ हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत भारताचा कर्णधार सूर्या टॉस जिंकतो की न्यूझीलंडचा कर्णधार सँटनर, याकडेच सर्व क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

## 'ही' चूक टीम इंडियाला महागात पडणार? सुनील गावसकरांचा सल्ला

**महाईन्यूज । मुंबई**

**भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील दुसऱ्या सेमी फायनलचा सामना रंगला. दोन्ही संघांनी मिळून एकूण ४९९ धावा कुटल्या. पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या भारतीय संघाने २५३ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या इंग्लंडचा संघ विजयापासून अवघ्या ७ धावा दूर राहिला.**






भारतीय संघ या प्रतिष्ठेच्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात बलाढ्य न्यूझीलंड संघाचा सामना करणार आहे. दोन्ही संघांमध्ये याआधीही मोठ्या स्पर्धांमध्ये चुरशीच्या लढती पाहायला मिळाल्या आहेत. विशेष म्हणजे यापूर्वी झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात देखील भारत आणि न्यूझीलंड हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. त्या वेळी झालेल्या रोमांचक सामन्यात भारतीय संघाने उत्कृष्ट कामगिरी करत न्यूझीलंडचा पराभव केला होता आणि विजेतेपदावर आपले नाव कोरले होते. त्यामुळे या आगामी अंतिम सामन्याकडे क्रिकेटप्रेमींचे विशेष लक्ष लागले आहे. मात्र यावेळी परिस्थिती थोडी वेगळी असून काही बाबी अशा आहेत ज्यामुळे भारतीय संघाच्या डोकेदुखीत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संघाच्या फलंदाजीतील काही बाबी सध्या चिंतेचा विषय ठरत आहेत. सलामीवीर फलंदाज अभिषेक शर्मा सातत्याने स्वस्तात बाद होत असल्याचे दिसून येत आहे. त्याला चांगली सुरुवात करण्यात अडचणी येत असून त्यामुळे संघावर अतिरिक्त दबाव येतो. दुसरीकडे संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याला अनेक वेळा चांगली सुरुवात मिळत असली तरी त्या सुरुवातीचे मोठ्या आणि निर्णायक खेळीत रूपांतर करण्यात तो अपयशी ठरत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे मधल्या फळीवर अतिरिक्त जबाबदारी येत आहे.

दरम्यान, या सामन्यापूर्वी माजी भारतीय कर्णधार आणि महान फलंदाज सुनील गावसकर यांनी भारतीय संघाच्या गोलंदाजीबाबत चिंता व्यक्त केली आहे. इंडिया टुडे या माध्यमाशी बोलताना त्यांनी विशेषतः पॉवरप्लेतील गोलंदाजी हा भारतासाठी सर्वात मोठा चिंतेचा विषय असल्याचे स्पष्टपणे सांगितले. गावसकर म्हणाले, "माझ्या मते पॉवरप्लेमधील गोलंदाजी ही भारतासाठी सर्वात मोठी समस्या ठरू शकते. कारण गोलंदाजांनी ज्या प्रकारे क्षेत्ररक्षणाची मांडणी करण्यात आली आहे, त्यानुसार गोलंदाजी होताना दिसत नाही. पावरप्लेमध्ये फक्त दोन क्षेत्ररक्षक ३० यार्ड सर्कलच्या बाहेर असतात, त्यामुळे धावांची गती रोखणे आधीच कठीण असते. मात्र अशा परिस्थितीत गोलंदाजांनी अचूक लाईन आणि लेंथ राखणे अत्यंत महत्त्वाचे असते." त्यांनी पुढे असेही सांगितले की, फलंदाज कोणता फटका खेळण्याचा प्रयत्न करणार आहे याचा काही प्रमाणात अंदाज लावता येतो. पण जर गोलंदाजांनी चुकीच्या लाईनवर गोलंदाजी केली, तर फलंदाजांना रिव्हर्स स्वीप किंवा इतर आक्रमक फटके खेळण्याची संधी सहज मिळते. त्यामुळेच गोलंदाजांनी अधिक अचूकता आणि शिस्त राखणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, नुकत्याच झालेल्या एका सामन्यातील उदाहरण देत गावसकरांनी पॉवरप्लेतील गोलंदाजी किती महत्त्वाची असते हेही अधोरेखित केले. वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सामन्यात इंग्लंड संघाने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले होते. प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरलेल्या भारतीय संघाने दमदार सुरुवात केली. विशेषतः संजू सॅमसनने अत्यंत आक्रमक आणि आकर्षक फलंदाजी करत ८९ धावांची वादळी खेळी साकारली. त्याच्या या शानदार खेळीच्या जोरावर भारतीय संघाने निर्धारित षटकांमध्ये २५३ धावांचा भक्कम डोंगर उभारला. इंग्लंडसमोर विजयासाठी २५४ धावांचे मोठे आव्हान ठेवण्यात आले होते.

या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडच्या फलंदाजांनी देखील जोरदार प्रत्युत्तर दिले. इंग्लंडचा फलंदाज जेकब बेथेल याने १०५ धावांची शानदार शतकी खेळी करत संघाला सामन्यात टिकवून ठेवले. सुरुवातीला इंग्लंडला काही मोठे धक्के बसले होते, मात्र त्यानंतरही त्यांच्या फलंदाजांनी आक्रमक खेळ कायम ठेवला. विशेषतः पॉवरप्लेतील फलंदाजी करताना इंग्लंडने अवघ्या सहा षटकांत ६८ धावा केल्या, ज्यामुळे भारतीय गोलंदाजांवर दबाव वाढला. या उदाहरणावरून पॉवरप्लेमध्ये धावा रोखणे किती महत्वाचे आहे, हे स्पष्ट होत असल्याचे क्रिकेट तज्ज्ञांचे मत आहे. आगामी अंतिम सामन्यातही भारतीय संघाने या बाबीकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। शनिवार ।

दि. 07 मार्च 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# 'पुणे मेट्रोपोलिटन रिजन'च्या विकासाला शाश्वत गती!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे PMR वर विशेष लक्ष | भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांची प्रतिक्रिया

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प २०२६–२७ सादर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे मेट्रोपोलिटन रिजन (PMR) वर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी भुयारी मार्ग, उन्नत रस्ते जाळे आणि औद्योगिक व आर्थिक संधी उपलब्ध करून देण्यावर या अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे.**



भाजपा नेते व आमदार महेश लांडगे यांनी महाराष्ट्रा या विकासात्मक उपाययोजनांचा स्वागत करताना म्हटले आहे की, “महाराष्ट्राचे अर्थसंकल्प २०२६–२७ हा फक्त एक आर्थिक दस्तऐवज नाही, तर ‘विकसित महाराष्ट्र 2047’ कडे जाणारा रोडमॅप आहे. पुणे-पिंपरी-चिंचवड सारख्या महानगरांना आणि ग्रामीण भागांना समर्पित या धोरणांनी राज्याचा सर्वांगीण विकास सुनिश्चित केला आहे, हे स्पष्ट दिसते.



“पुणे मेट्रोपोलिटन रिजनचा सर्वांगीण विकास हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सुधारणा घडवून आणेल.

रोजगार, उद्योग, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि सामाजिक कल्याण या सर्व क्षेत्रांमध्ये यामुळे गती येईल. मुख्यमंत्री फडणवीस यांचे PMR वर लक्ष हे शहराच्या भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आम्ही या रोडमॅपचा पूर्ण पाठिंबा देतो आणि पुण्याच्या नागरिकांसाठी सर्वोत्तम लाभ सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्नशील राहू. श्रीक्षेत्र आळंदी तीर्थक्षेत्र, जगद्गुरू संत तुकाराम महाराज जन्मस्थान देहू विकास आराखडा, भीमाशंकर तीर्थक्षेत्र विकास, पुणे व पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक सक्षमीकरण, प्रदूषण नियंत्रण, जलस्त्रोत या मुद्यांवर राज्य सरकार शाश्वत दृष्टीकोनातून काम करीत आहे, असा विश्वासही भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

> पुणे मेट्रोपोलिटन रिजनच्या विकासासाठी हा अर्थसंकल्प नवा गतीमान रोडमॅप ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष लक्ष आणि राज्य सरकारच्या प्रयत्नांमुळे, पुणे आणि पिंपरी-चिंचवसह ग्रामीण परिसरातील नागरिकांना रोजगार, उद्योग, पायाभूत सुविधा आणि सामाजिक कल्याण या सर्व क्षेत्रांमध्ये शाश्वत लाभ मिळेल. या महत्त्वाकांक्षी अर्थसंकल्पाचे आम्ही स्वागत करीत आहोत.
>
> – महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

### पिंपरी-चिंचवडमध्ये होणार अजितदादांचे स्मारक..!

राज्यातील विविध औद्योगिक प्रकल्प, महिला व शेतकरी कल्याण, तंत्रज्ञान आणि नवउद्योग प्रोत्साहन, तसेच सामाजिक कल्याण योजनांवरही या अर्थसंकल्पात भर दिला आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली म्हणून भव्य स्मारक उभारणे आणि त्यांच्या नावावर गतीमान नागरी सेवा पुरस्कार सुरू करण्याचे घोषणाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अर्थसंकल्पात केली. पिंपरी-चिंचवडमध्ये “अजितसृष्टी व स्मारक” उभारण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने मंजुर केला आहे. मुख्यमंत्र्यांच्या घोषणेमुळे त्याला बळ मिळेल, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्राच्या विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प : शत्रुघ्न काटे

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठीचा राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर केला. या अर्थसंकल्पाचे स्वागत करत भाजपाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी हा अर्थसंकल्प राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा आणि सर्व घटकांसाठी आशादायी असल्याची प्रतिक्रिया दिली.**





भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवडचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला हा अर्थसंकल्प “विकसित महाराष्ट्र २०४७” या ध्येयाकडे नेणारा महत्त्वाचा टप्पा आहे. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी २ लाखांपर्यंत कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन, तसेच महिला शेतकऱ्यांसाठी विशेष योजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

तसेच, औद्योगिक विकासासाठी प्रत्येक जिल्ह्यात औद्योगिक समूह उभारण्याचा संकल्प, गडचिरोली येथे स्टील हब, तसेच अटल सेतू परिसरात तिसरी मुंबई आणि वाढवण येथे चौथी मुंबई उभारण्याची घोषणा करण्यात आली आहे. पायाभूत सुविधांसाठी भुयारी व उन्नत मार्ग, तसेच मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील स्थानकांचे काम प्रगतीपथावर असल्याचेही त्यांनी नमूद केले. याशिवाय मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सुरू ठेवणे, दिव्यांगांसाठी कौशल्य विकास केंद्रे, प्रशासनात AI चा वापर आणि मोठ्या प्रमाणावर पदभरती यांसारखे निर्णयही सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले.

> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सादर झालेला हा अर्थसंकल्प शेतकरी, उद्योग, तरुण आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विकासाचा रोडमॅप आहे. पिंपरी चिंचवड शहरासह पुणे जिल्ह्यालाही या महत्वाकांक्षी अर्थसंकल्पाचा फायदा होणार आहे, एकंदरीतच महाराष्ट्राला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेणारा हा अर्थसंकल्प ठरेल, याची खात्री आहे.
>
> - शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, पिं.चिं.शहर.

# गव्हाणे वस्तीतील गणेश मंदिराचा जिर्णोद्धार

## नगरसेविका प्रा. सोनाली गव्हाणे व सामाजिक कार्यकर्ते दत्ताभाऊ गव्हाणे यांचा पुढाकार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भोसरी परिसरातील गव्हाणे वस्ती येथे श्रद्धास्थान असलेल्या गणेश मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी महत्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. फाल्गुन शके १९४८ गुरुवार दिनांक ५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता गणेश मंदिराच्या जिर्णोद्धाराच्या कामाचे भूमिपूजन उत्साहात पार पडले.**



या उपक्रमासाठी परिसराच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या नगरसेविका सोनाली गव्हाणे आणि सामाजिक कार्यात सक्रिय असलेले दत्ताभाऊ गव्हाणे यांचा विशेष पुढाकार लाभला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि सहकार्यामुळे मंदिराच्या जिर्णोद्धाराचे काम प्रत्यक्षात सुरू होत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. भोसरी परिसरातील धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी हे गणेश मंदिराच्या जिर्णोद्धाराचे काम महत्व पूर्ण ठरणार आहे. मंदिराचे सुशोभीकरण, परिसराचा विकास आणि भाविकांसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन अजिंक्य मित्र मंडळ, आदिनाथ नगर, सुखवाणी बाग जवळ, गव्हाणे वस्ती, भोसरी, पुणे ४११०३९ येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, कार्यकर्ते आणि गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमासाठी साईराजे फ्रेंड्स सर्कल यांचे विशेष सौजन्य लाभले असून, भविष्यातही परिसराच्या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक विकासासाठी असे उपक्रम राबवले जातील, असा ठाम विश्वास उपस्थित नागरिकांनी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

> गव्हाणे वस्तीतील गणेश मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून परिसरातील नागरिकांच्या श्रद्धेचे आणि एकतेचे केंद्र आहे. मंदिराच्या जिर्णोद्धारामुळे भाविकांना अधिक चांगल्या सुविधा मिळतील आणि परिसराच्या सांस्कृतिक परंपरेलाही बळ मिळेल. स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने हे काम दर्जेदार आणि लवकर पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> - प्रा. सोनाली गव्हाणे, नगरसेविका, पिंपरी चिंचवड महापालिका

# नेमबाज राष्ट्रीय खेळाडूकडून भाजपा क्रीडा प्रकोष्ट शहराध्यक्षपदाचा "लक्ष्यभेद"

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**राष्ट्रीय स्तरावरील नेमबाज खेळाडू अरुण सुभाष पाडुळे यांची भारतीय जनता पक्षाने (भाजप) पिंपरी-चिंचवड शहरातील क्रीडा प्रकोष्ठाचे शहराध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. ही महत्त्वाची नियुक्ती भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बाप्पू) काटे यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आली.**




अरुण पाडुळे हे स्वतः राष्ट्रीय खेळाडू असून प्रशिक्षक म्हणूनही त्यांनी अनेक खेळाडूंना राष्ट्रीय पातळीवर पोहोचवले आहे. विशेष म्हणजे, भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांचे निष्ठावंत सहकारी म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या अनुभवामुळे शहरातील क्रीडा क्षेत्राला नवे बळ मिळेल, अशी अपेक्षा पक्षातील आणि क्रीडा क्षेत्रातील नेत्यांनी व्यक्त केली आहे.

नवीन जबाबदारी स्वीकारल्यानंतर अरुण पाडुळे यांनी आमदार महेश लांडगे यांची मुंबईत भेट घेतली. पुढील वाटचालीसाठी आणि शहरातील खेळाडूंना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यासाठी ठोस योजना आखण्यासाठी चर्चा करण्यात आली. या भेटीनंतर अरुण पाडुळे यांनी सांगितले की, "आमदार महेश लांडगे यांची भेट आणि मार्गदर्शन खूप प्रेरणादायी ठरली. शहरातील खेळाडूंना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी आम्ही ठोस योजना आखत आहोत. योग्य प्रशिक्षण, सुविधा आणि संधी उपलब्ध करून देण्याच्या कामात आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत."

भाजपाचे आमदार महेशदादा लांडगे यांनीही अरुण पाडुळे यांचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यांनी म्हटले, "अरुण सर खेळाडूंना आंतरराष्ट्रीय आणि ऑलिंपिक स्तरावर नेत राहतील. त्यांच्या नेतृत्वाखाली शहरातील क्रीडा क्षेत्र निश्चितच प्रगती करेल. आमच्या संघटनात्मक कामगिरीतून देखील खेळाडूंना संधी मिळतील आणि क्रीडा विकासाला चालना मिळेल." अरुण पाडुळे यांच्या नियुक्तीमुळे पिंपरी-चिंचवडमध्ये क्रीडा क्षेत्राचा समग्र विकास साधता येईल, आणि स्थानिक तसेच राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना योग्य मार्गदर्शन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> भाजपाच्या माध्यमातून शहरातील प्रत्येक खेळाडूला योग्य संधी आणि प्रशिक्षक मिळावा, आणि ते राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकावेत, यासाठी मी पूर्णपणे कटिबद्ध आहे. आमदार महेश लांडगे यांचे मार्गदर्शन आणि पाठबळ यामुळे आमचे काम अधिक ठोस आणि परिणामकारक होईल.
>
> - अरुण पाडुळे, शहराध्यक्ष, क्रीडा प्रकोष्ट, भाजपा.

# संत तुकाराम महाराज बीज सोहळा उत्साहात

## वाकसई येथे हभप आदिनाथ महाराज दानवे यांचे प्रभावी कीर्तन

**महाईन्यूज** I पिंपरी-चिंचवड

**जगद्गुरू संत तुकाराम महाराज झाड पादुका स्थान, वाकसई येथे श्री तुकाराम बीजनिमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात हभप आदिनाथ महाराज दानवे (बीड) यांची कीर्तन सेवा पार पडली. संत तुकाराम महाराजांच्या निर्वाण प्रसंगाचे वर्णन करताना, माणसाचे जगणे आणि जगातून जाणे दोन्ही स्मरणीय असले पाहिजे, असा मोलाचा संदेश त्यांनी यावेळी दिला. सकाळी 10 ते दुपारी 12 या वेळेत ही कीर्तन सेवा पार पडली. 12 वाजता पुष्पवृष्टी करत जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या सदेह वैकुंठगमन सोहळ्याचे स्मरण करण्यात आले.**



निरूपण करताना महाराज म्हणाले की, या जगात प्रत्येक जण जगण्यासाठी धडपडत असतो; मात्र, तुकोबाराय स्वतःच्या निर्णयाने “जाता”असे म्हणतात. त्यांच्या या जाण्याने जगाला वेड लावले. मोठ्या घरात जन्म घेणारी माणसे केवळ जिवंत असेपर्यंतच मोठी असतात, पण जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आहेत, तोपर्यंत संत तुकाराम महाराजांचे स्मरण राहील. माणसाचा जन्म कुठे झाला यापेक्षा तो कसा जगला आणि कसा गेला, याला सर्वाधिक महत्त्व आहे. कीर्तनाच्या अंतिम टप्प्यात मफआम्ही जातो तुम्ही कृपा असू द्यावीःफफ या हृदयस्पर्शी अभंगाने जगद्गुरू जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या सदेह वैकुंठगमन सोहळ्याच्या कीर्तनाची सांगता झाली. यावेळी उपस्थित सर्व भाविक भक्तीरसात तल्लीन झाले होते. जगद्गुरु संत तुकाराम महाराज झाड पादुका स्थान सेवा ट्रस्ट व मासिक दिंडी समाज मावळ तालुका यांच्या वतीने या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावर्षीचे कीर्तन सोहळ्याचे ही 30 वे वर्ष आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराज वैकुंठ गमन सोहळ्यासाठी तीर्थक्षेत्र देहूगाव येथे इंद्रायणी नदीच्या काठी वैष्णवांचा मेळा एकत्र आला होता. या वेळी बीज सोहळ्यासाठी आलेल्या भाविकांनी ज्ञानोबा-तुकाराम असा नामघोष केल्याने परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. बीज सोहळ्यासाठी देहूगाव येथील मुख्य मंदिरातून वैकुंठ गमन सोहळा मंदिराकडे पालखी घेऊन जाताना वारकरी. तसेच इंद्रायणीच्या काठी वासुदेवांनी केलेली जनजागृती. या सोहळ्यात फुगडी घालून वारकऱ्यांनी आनंदोत्सव साजरा केला. तसेच संबळवादन करत जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या बीजसोहळ्यात सहभाग घेत नामघोष करताना गोंधळी. हा सोहळा निर्घ्न पार पाडण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आपली परंपरा व वारी पुढील पिढीला कळावा म्हणून आपल्या नातवांना खांद्यावर घेऊन फिरताना वयोवृद्ध वारकरी. हा सुखसोहळा आपल्या डोळ्यांनी टिपण्यासाठी लाखो वारकरी आज देहूनगरीत दाखल झाले होते.

# नगरसेविका कविता भोंगाळे यांच्या उपस्थितीत भवानी शक्ती शिवजयंती उत्सव उत्साहात

**महाईन्यूज** I पिंपरी-चिंचवड

**: छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त हिंदवी स्वराज्य ग्रुप व श्रीकृष्ण तरुण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला ‘भवानी शक्ती शिवजयंती उत्सव २०२६’ हा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. परिसरातील शिवभक्त, नागरिक आणि तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवजयंती उत्सवाला अभूतपूर्व प्रतिसाद दिला.**





कार्यक्रमाची सुरुवात शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण आणि दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिवरायांच्या कार्याची आणि त्यांच्या अद्वितीय नेतृत्वाची आठवण करून देत स्वराज्य, स्वाभिमान आणि समाजसेवा या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. शिवभक्तांनी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला आणि संपूर्ण वातावरण शिवमय झाले.

उत्सवाच्या निमित्ताने विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात शिवचरित्रावर आधारित भाषणे, पोवाडे, भजन, तसेच तरुणांच्या सहभागातून सादर केलेले सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश होता. या कार्यक्रमांमुळे उपस्थितांना शिवरायांच्या शौर्य, पराक्रम आणि दूरदृष्टीची प्रेरणादायी झलक अनुभवायला मिळाली. कार्यक्रमादरम्यान आयोजकांनी शिवरायांच्या विचारांवर आधारित समाजजागृतीचा संदेश देत तरुणांनी राष्ट्रनिर्माणात सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहन केले. शिवरायांनी उभे केलेले हिंदवी स्वराज्य हे केवळ इतिहास नसून आजच्या समाजासाठी प्रेरणेचा दीपस्तंभ आहे, असे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

शिवभक्तांच्या उत्साहाने आणि भक्तिभावाने भारलेल्या या सोहळ्यात सहभागी होण्याचे भाग्य लाभल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. कार्यक्रमामुळे उपस्थित प्रत्येकाच्या मनात स्वराज्य, संस्कार आणि समाजसेवेची प्रेरणा जागृत झाली. या भव्य आणि प्रेरणादायी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व यशस्वी आयोजन केल्याबद्दल हिंदवी स्वराज्य ग्रुप व श्रीकृष्ण तरुण मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आणि कार्यकर्त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

> “छत्रपती शिवाजी महाराजांनी उभे केलेले हिंदवी स्वराज्य हे केवळ इतिहासातील सुवर्णपान नसून आजच्या समाजासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. शिवरायांच्या धैर्य, न्याय आणि समाजकल्याणाच्या विचारांना पुढे नेत तरुणांनी समाजसेवा, संस्कार आणि राष्ट्रभक्तीची परंपरा अधिक बळकट करावी. अशा प्रेरणादायी उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि आपण सर्वजण मिळून शिवरायांचे आदर्श पुढील पिढीपर्यंत पोहोचवू शकतो.
>
> — कविता भोंगाळे, **नगरसेविका, भाजपा.**

# सामाजिक न्याय, शिक्षण आणि विकासाला चालना देणारा सर्वसमावेशक अर्थसंकल्प..!

## आमदार अमित गोरखे यांनी दिली अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**राज्याचे मुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सादर केलेला २०२६-२७ चा अर्थसंकल्प हा केवळ राज्याचा आर्थिक ताळेबंद नसून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा दूरदृष्टीपूर्ण आराखडा असल्याची प्रतिक्रिया विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी व्यक्त केली. सामाजिक न्याय, शिक्षण, पायाभूत सुविधा, महिला सक्षमीकरण, शेतकरी कल्याण आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून राज्याला प्रगत अर्थव्यवस्थेकडे नेण्याचा स्पष्ट दृष्टिकोन या अर्थसंकल्पातून दिसून येतो, असे त्यांनी सांगितले.**



अर्थसंकल्प सादर करताना दिवंगत नेते अजित पवार यांच्या कार्याला वाहिलेली आदरांजली ही महाराष्ट्राच्या जनतेच्या भावनांचे प्रतिबिंब असल्याचे गोरखे यांनी नमूद केले. त्यांच्या प्रशासनिक कार्यशैलीचा गौरव करण्यासाठी 'अजित पवार गतिमान नागरी सेवा पुरस्कार' सुरू करण्याचा निर्णय तसेच त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी भव्य स्मारक आणि 'अजितसृष्टी' उभारण्याची घोषणा स्वागतार्ह असल्याचे त्यांनी सांगितले. या अर्थसंकल्पातील महत्त्वाचा निर्णय म्हणजे अनुसूचित जाती घटकांमधील आरक्षणाच्या उपवर्गीकरणासंदर्भात राज्य सरकारने समिती गठित करण्याचा घेतलेला निर्णय होय. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार वंचित घटकांना न्याय मिळावा आणि आरक्षणाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचावा, यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आमदार गोरखे यांनी सांगितले. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अनुसूचित जातींसाठी २३,१५० कोटी आणि आदिवासी समाजासाठी २१,७२३ कोटींची भरीव तरतूद करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. 'बार्टी', 'सारथी' आणि 'महाज्योती' यांसारख्या संस्थांना दिलेला निधी मागास व वंचित समाजातील विद्यार्थ्यांना आणि तरुणांना सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरेल, असेही त्यांनी सांगितले. शिक्षण आणि कौशल्य विकास क्षेत्रालाही या अर्थसंकल्पात मोठे प्राधान्य देण्यात आले आहे. 'एज्युसिटी' संकल्पना, 'मुख्यमंत्री विज्ञान वारी' सारखे उपक्रम तसेच तरुणांसाठी ७५ हजार पदभरतीचा निर्णय यामुळे राज्यातील युवकांना नवीन संधी उपलब्ध होतील. ५० हजार नवउद्योजक उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय उद्योजकतेला चालना देणारा ठरेल, असे त्यांनी नमूद केले. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने 'लाडकी बहीण' योजनेची भरीव तरतूद आणि २५ लाख महिलांना 'लखपती दीदी' बनवण्याचे उद्दिष्ट हे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल असल्याचे गोरखे म्हणाले. शेतकरी कल्याणासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना' अंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी आणि नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय हा बळीराजाला दिलासा देणारा असल्याचे त्यांनी सांगितले. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता वापरण्याचा निर्णय राज्याला आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित शेतीकडे नेणारा ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यात आली असून पुणे मेट्रो विस्तार, बुलेट ट्रेन प्रकल्पाची प्रगती, 'तिसरी मुंबई' उभारणी आणि नवीन रेल्वे मार्गांमुळे औद्योगिक विकासाला गती मिळणार आहे. विशेषतः पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसराला याचा मोठा फायदा होणार असल्याचे आमदार गोरखे यांनी स्पष्ट केले. धार्मिक व सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठीही सरकारने मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. नाशिक-त्र्यंबक कुंभमेळा, पंढरपूर विठ्ठल मंदिर विकास आराखडा, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांचे जतन आणि संतांच्या जन्मस्थळांचे संवर्धन यांसारख्या उपक्रमांमुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेला बळ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट' विकसित करण्याचा निर्णयही स्वागतार्ह असल्याचे गोरखे यांनी म्हटले.

> अर्थसंकल्प सर्वसमावेशक, सर्वस्पर्शी आणि भविष्यवेधी असून सामाजिक न्याय, शिक्षण, विकास आणि पायाभूत सुविधांच्या माध्यमातून महाराष्ट्राला प्रगत अर्थव्यवस्थेकडे नेणारा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार सामान्य जनतेच्या, कष्टकऱ्यांच्या आणि वंचित घटकांच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे या अर्थसंकल्पातून स्पष्ट झाले आहे.
>
> - अमित गोरखे, आमदार, विधान परिषद.

# दिघीत छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याची मागणी

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**दिघी परिसराच्या सुशोभीकरणासाठी आणि शहराच्या प्रवेशद्वाराला ऐतिहासिक ओळख मिळावी यासाठी नगरसेविका श्रुती विकास डोळस यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे निवेदन सादर केले आहे. दिघी गावाच्या सुरुवातीला जकात नाका येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.**





दिघी हे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पूर्वेकडील शेवटचे टोक असून, पुण्याकडून श्रीक्षेत्र आळंदीकडे जाणाऱ्या मार्गावरील महत्त्वाचे प्रवेशद्वार मानले जाते. या मार्गावरून दररोज हजारो नागरिक, प्रवासी तसेच वारकरी ये-जा करत असतात. त्यामुळे या ठिकाणी शिवरायांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारल्यास परिसराची ओळख अधिक ठळक होईल, असे नगरसेविका डोळस यांनी निवेदनात नमूद केले आहे.

यासोबतच जकात नाका चौकाचे आधुनिक पद्धतीने सुशोभीकरण करण्याचीही त्यांनी मागणी केली आहे. पुतळ्याच्या सभोवताल आकर्षक विद्युत रोषणाई, कारंजे, वृक्षारोपण आणि सुबक रचना करून हा चौक शहरातील एक आकर्षण केंद्र बनवता येईल, असे त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. नगरसेविका श्रुती डोळस या आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असून, त्या माजी नगरसेवक तथा भाजपाचे सरचिटणीस विकास डोळस यांच्या सौभाग्यवती आहेत. या प्रकल्पामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडेलच, शिवाय येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांना आणि तरुण पिढीला CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ यांच्या जाज्वल्य इतिहासाची प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. तसेच महानगरपालिकेने या मागणीचा सकारात्मक विचार करून लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी विनंतीही त्यांनी प्रशासनाकडे केली आहे

> दिघी हे पिंपरी-चिंचवड शहराचे पूर्वेकडील महत्त्वाचे प्रवेशद्वार असून, या ठिकाणाला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळख मिळणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारल्यास परिसराचे सौंदर्य वाढेल आणि येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना शिवरायांच्या पराक्रमाची सतत प्रेरणा मिळेल. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रस्ताव पुढे नेऊन प्रशासनाच्या सहकार्याने हा प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.
>
> - श्रुती डोळस, नगरसेविका, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.